**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम, १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७४४/ २००९/ सोलापूर | श्री. परशुराम लक्ष्मण करंदीकर घ. नं. ३००२/ ब, किर्तन प्रसाद, दत्त मंदिराजवळ, बार्शी, जि. सोलापूर | निरीक्षक (आस्था.), अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे - १ | आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे - १ | शासन पत्र क्र २००७ / प्र क्र. १ आस्था २, मंत्रालय, मुंबई दि. २.४.२००७ अन्वये मागितलेली माहिती मंत्रालयात पाठविली का, प्रस्ताव सादर केला का, व मागितलेली माहिती सबंधितांना पाठविली आहे का,त्याबाबतचा खुलासा. | जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सबंधित माहिती द्यावी. मात्र खुलासे मागणे ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. |
| २ | १४८२/ सोलापूर | श्री. दगडु पंढरीनाथ जाधव उपळाई रोड, देशमुख प्लॉट, श्रीकृष्ण कॉलनी, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | उपविभागीय पोलिस अधिकारी, बार्शी विभाग बार्शी, जि. सोलापूर | पोलिस उपअधिक्षक (मु.) पोलिस अधीक्षक, कार्यालय, सोलापूर (ग्रामीण), सोलापूर | अर्ज क्र. ११४/०२, अर्ज क्र. ९२/०२ व १०२/०५या अर्जांच्या प्रती व चौकशीच्या प्रती इ. माहिती. | अपीलकर्त्यास १५ दिवसात माहिती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी दि १६.७.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | १५३०/ सोलापूर | श्री. रमेश मोहनराव ठिगळे पांडुरंग गृहनिर्माण सोसायटी, लिंकरोड, पंढरपूर, जि. सोलापूर | अंतर्गत लेखापरिक्षक, (आस्थापना विभाग) नगर परिषद, पंढरपूर जि. सोलापूर | मुख्याधिकारी, नगर परिषद पंढरपूर, जि. पंढरपूर | नगर पालिका प्रशासन संचालनालयाने दि. १४.२.२००८ रोजी दिलेल्या सूचनेनुसार राज्यस्तरीय संवर्गात समावेश करण्याबाबत नगरपरिषद | अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाल्याचे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १६.७.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | आस्थापनेवरील व बरोबरच्या इतर कर्मचा-यांच्या प्रस्तावाची प्रत, पंढरपूर नगरपालिकेच्या कर्मचा-यांचा आकृतीबंध माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नियम ४ नुसार अभिलेख पाहण्यास मिळणेबाबत इ. मुद्दयांची माहिती. | कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | १५३२/ सोलापूर | श्री. राजेभाई मकबूल शेख मु. पो. अरळी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर | संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १, पुणे विभाग, पुणे | पोलिस उपअधिक्षक, दक्षता पथक, जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र - १, पुणे विभाग, पुणे | सन २००७ ते २००८ या कालावधीतील पोलिस दक्षता पथक विभागीय जाती पडताळणी समिती क्र १ कडे किती प्रकरणे दाखल झाली याची यादी व सर्व चौकशी अहवालाच्या साक्षांकित प्रती इ. माहिती | अपीलकर्त्यास १५ दि[illegible]त माहिती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.७.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे |
| ५ | १५३३/ सोलापूर | श्री. राजेभाई मकबूल शेख मु. पो. अरळी, ता.अक्कलकोट, जि. सोलापूर | सदस्य सचीव. विभागीय जाती पडताळणी समिती क्र. १ पुणे विभाग, पुणे | अध्यक्ष / सदस्य सचीव, विभागीय जाती पडताळणी समिती क्र. १ पुणे विभाग, पुणे | श्री तरन्नूम अ. राशीद शेख व झीनत अ. रजाक कोतकुडे यांना जाती वैधता प्रमाणपत्र देताना त्यांनी दाखल केलेली कागदपत्रे, समिती कडून करण्यात आलेली कार्यवाही, रोजनामा व अहवालाच्या साक्षांकित प्रती. | अपीलकर्त्यास १५ दिवसात माहिती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.७.२००९ रोजी[illegible] 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील एकूण ५ अपिले अनुक्रमांक १ ते ५ (७४४/२००९/सोलापूर, १४८२/ सोलापूर, १५३०/सोलापूर,१५३२/सोलापूर, व १५३३/सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र १४८२, १५३०,१५३२ व १५३३ व ७४४/ सोलापूर प्रकरणी निष्कर्षात नमूद /

आदेशित केल्यानुसार विहीत कालमर्यादेत माहिती देऊन अनुपालन अहवाल मुदतपूर्तीनंतर आठ दिवसांत आयोगास सादर करावा. अन्यथा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्तीसह तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

पुणे
दि. ३१.०७.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७६८/ २००९/ कोल्हापूर | श्री.बाबुराव शंकर मोरे तिरंगा कॉलनी, गल्ली नं. २, कबनुर, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर | जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, कबनुर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर | अपीलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, हातकणंगले, जि.कोल्हापूर | कबनुर ग्रामपंचायत, तिरंगा कॉलनी, गल्ली नं. २, येथील ग्रामपंचायत हद्दीत सरकारी रस्त्यावर करण्यात येणा-या बांधकामाबाबतची माहिती | चबुत-याचे बांधकाम शासकीय योजनेतून असून शासकीय योजना व शासकीय इमारतीसाठी ग्रामपंचायतीची बांधकाम परवानगीची आवश्यकता नसल्याने सदर कामास बांधकाम परवानगी दिलेली नाही, असे उत्तर जन माहिती अधिकारी यांनी दिले आहे. |
| २ | ७४०/ २००९/ कोल्हापूर | श्री. समीर सिताराम वांद्रे, प्लॉट नं. ३६०, आर. के. नगर, सो.नं. २, पाचगांव, कोल्हापूर | जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (प्रशासन) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर | प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर | सरळ सेवा भरतीने नेमणूक झालेल्या कर्मचा-यांचे पत्ते व सविस्तर माहिती, तसेच नेमणूक केलेल्या कर्मचा-यांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेला पत्ता, नाव जाहिरातीचा तपशील इत्यादी बाबतची पदनिहार माहिती | जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित केलेल्या समय मर्यादेचे व सूचनांचे अनुपालन करुन अपिलकर्त्यास माहिती देण्यासंदर्भात योग्य कार्यवाही केल्याचे अपिलीय प्राधिकारी यांनी दिनांक २९.६.२००९ रोजी दिलेल्या निर्णयात नमूद केले आहे. त्यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ४४५/ २००९/ कोल्हापूर | श्री. सुधाकर कृष्णा कुलकर्णी ११८५/ख-२, दुसरी गल्ली, राजारामपुरी, कोल्हापूर-४१६००८ | जन माहिती अधिकारी तथा कक्षअधिकारी राज्य माहिती आयोग,पुणे खंडपीठ पुणे - ४११००१ | प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ पुणे - ४११००१ | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी संबंधातील अभिप्राय, खुलासे इत्यादी बाबतची माहिती | जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व माहिती अधिकार अधिनियम,२००५ हा सार्वजनिक दस्तऐवज असून अपिलकर्त्यांनी सदर अधिनियमातील तरतुदींचे परिशीलन करुन त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त करावी, हा अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

वरील तक्त्यात नमुद केलेली एकूण तीन अपिले (अपील क्र. ७६८/ २००९/ कोल्हापूर, ७४०/ २००९/ कोल्हापूर, ४४५/ २००९/ कोल्हापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१ .०७.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम, १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७६८/ सोलापूर | चेअरमन, राजस्वनगर सहकारी गृह-निर्माण संस्था मर्या., प्रतापनगर रोड, सोलापूर | चेअरमन, राजस्वनगर सहकारी गृह-निर्माण संस्था मर्या., प्रतापनगर रोड, सोलापूर | उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर, नवल पेट्रोल पंपासमोर, सोलापूर | श्री अर्जुन लक्ष्मण तरंगे यांनी चेअरमन, राजस्व - नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., सोलापूर संस्थेबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे .मागितली होती सदर अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था सोलापूर शहर यांनी दि. २२.१०. २००७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे अपील दाखल केले आहे. | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार अपील व्यक्तींच्या नावे करणे आवश्यक आहे. पदनामाने नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा सहकारी गृहनिर्माण संस्थाना लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिटपिटीशन क्र. ५६६६/२००७ मध्ये दिलेला आहे. |
| २ | ७६८/ अ / सोलापूर | चेअरमन, राजस्वनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., प्रतापनगर रोड, सोलापूर | चेअरमन, राजस्वनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., सोलापूर, रोड, सोलापूर | उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर | श्री अर्जुन लक्ष्मण तरंगे यांनी चेअरमन, राजस्वनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., सोलापूर संस्थेबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. सदर | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार अपील व्यक्तींच्या नावे करणे आवश्यक आहे, पदनामाने नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था सोलापूर शहर यांनी दि. २३.११.२००७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे अपील दाखल केले आहे. | सहकारी गृहनिर्माण संस्थाना लागू नाही. असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिटपिटीशन क्र. ५६६६/२००७ मध्ये दिलेला आहे. |
| ३ | १२९८/ सोलापूर | श्री. भास्कर ज्ञानोबा शिंदे मु. पो. औढी, ता. मोहोळ, जि. सोलापूर | सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., औढी, ता. मोहोळ, जि. सोलापूर | सहायक निबंधक, सहकारी संस्था, मोहोळ, जि. सोलापूर | १९८९ ते २००७ पर्यत घेतलेल्या कर्जाचे खाते उतारे, कर्जाचा तपशील, व्याज, मुद्दल, शेअर्स रक्कम इत्यादी. माहिती | माहिती मिळाल्याने तक्रार नसल्याचे अपीलक[illegible]ने दि. २.७.२००८ रोजी सहायक निबंधक, मोहोळ यांना कळविले. सदर पत्राची प्रत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १६.७.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम'तील प्रपत्रासोबत सादर केली आहे. |
| ४ | १५२१/ सोलापूर | श्री. काशीनाथ माणिकराव शेटे मु. पो. खडकपूरा, ता. करमाळा, जि. सोलापूर | १) चेअरमन/ सचिव, सहकार महर्षि शंकरराव माहिते पाटील नागरी सह. पतसंस्था मर्या., बारलोणी, शाखा केम., ता. करमाळा, जि. सोलापूर २) सहायक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा, जि. सोलापूर | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर | पतसंस्थेचा २००५ - २००६ लेखा परिक्षण अहवाल, २००३ मध्ये कर्ज घेताना दिलेल्या सर्व कागदपत्रांची छायाप्रत, बचत खाते क्र. ३२० सुरू करताना सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती, व इतर एकूण ६ मुद्दयांची माहिती. | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ [illegible] नागरी सहकारी बँका व पतसंस्था यांना लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिटपिटीशन क्र. ५६६६/२००७ मध्ये दिलेला आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | १५४७/ सोलापूर | श्री. भिमाशंकर संगप्पा दर्गोपाटील ६३६, उत्तर कसबा, सोलापूर | व्यवस्थापक, महेश अर्बन को. ऑप. बँक लि. १२८ शुक्रवार पेठ, सोलापूर | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर | सन २००१ ते २००७ अखेर कनिष्ठ लिपीक व परिचर शिपाई किती भरले त्यांची नावे, पत्ते व जात रोजंदारीवर घेतलेल्या व खंड दिलेल्या कर्मचा-यांना पुन्हा सेवेत घेतले आहे का, सदर कर्मचा-यांची नावे, पत्ते व जात इ. माहिती | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँका, पतसंस्था यांना लागू नाही. असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिटपिटीशन क्र. ५६६६/२००७ मध्ये दिलेला आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील अपिले एकूण ५ अपिले अनुक्रमांक १ ते ५ (अपील क्र ७६८/सोलापूर, ७६८/अ/सोलापूर, १२९८/सोलापूर, १५२१/सोलापूर, व १५४७/सोलापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्र ७६८/सोलापूर, ७६८/अ /सोलापूर १५२१/सोलापूर व १५४७/ सोलापूर प्रकरणी नियंत्रक अधिकारी म्हणून सहकारी संस्थांची जी माहिती सहकार खात्याच्या सबंधित कार्यालयांकडे उपलब्ध असने आवश्यक आहे. ती सबंधित कार्यालयांनी अर्जदारांना देणे बंधनकारक आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

पुणे
दि. ३१ .०७.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभाकर मारुती कोंढाळकर
बी-१, मुक्तानंद हौसिंग सोसायटी,
चव्हाणनगर, धनकवडी, पुणे-४३ — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, भोर, जि.पुणे — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,
भोर, तहसील कार्यालय, भोर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४८ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.६.२००८ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** श्री. प्रभाकर मारुती कोंढाळकर
बी-१, मुक्तानंद हौसिंग सोसायटी,
चव्हाणनगर, धनकवडी, पुणे-४३

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, भोर, जि.पुणे डॉ.रेखा सोळंके

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,
भोर तहसील कार्यालय, भोर, जि.पुणे श्री.एफ.अे.शेख

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती |
|---|---|
| | १. मौजे कुरंगवाडी येथील फेरफार क्र.४७ मध्ये सौ.शकुंतला शामराव शिळीमकर यांना कोणत्या मयत पुराव्याद्वारे दाखविले त्या सर्व कागदपत्रांच्या सहीशिक्क्याच्या नकला, याची नोंद कोणत्या अधिकाऱ्यांनी केली त्यांचे नाव, पत्ता व सध्याचा हुद्दा<br>२. मौजे कुरंगवाडी, ता.भोर या गावची दि. २३.५.१९७८ रोजी जमिन एकत्रीकरण योजना मंजूर झाली असून कायद्यातील कलम ३१ अन्वये जिल्हाधिकारी किंवा विभागीय आयुक्त यांच्या परवानगी शिवाय हस्तांतरण किंवा पोटविभाग करता येत नसताना देखील फेरफार क्र.१४६१ मध्ये पत्र क्र.आरटीएस/कावि/६२/०६ दि. १३.२.२००६ ने फेरफार क्र.४७ रद्द करून सौ. शकुंतला शामराव शिळीमकर यांचे नावे क्षेत्र ०.८८ आर कोणत्या कागदपत्रांद्वारे केले त्या कागदपत्रांच्या नकला<br>३. मौजे कुरंगवाडी, ता. भोर येथील दि. २७.६.१९८० रोजीचा फेरफार क्र.०१ ने मान्य केलेल्या फेरफारानुसार सौ. शकुंतला शामराव शिळीमकर यांचे नावे असलेला ७/१२ उतारा व ताबेपावतीची प्रत |

## विवेचन

मौजे कुरंगवाडी, ता. भोर, जि. पुणे येथील भूखंडाच्या फेरफारामध्ये सौ. शकुंतला शामराव शिळीमकर यांना मयत कोणत्या पुराव्याद्वारे दाखविले त्याबाबतची सर्व कागदपत्रे, हा फेरफार रद्द करून सौ. शिळीमकर यांचे नाव नोंदविण्याबाबतच्या कागदपत्रे व त्यांच्या नावाचा ७/१२ उतारा व ताबेपावती अशी माहिती अपीलकर्ता श्री. प्र[illegible]र मारूती कोंढाळकर यांनी उप विभागीय अधिकारी, भोर [illegible] १.२००७ [illegible]च्या अर्जाने मागितली होती. मागितलेली माहिती तहसीलदार कार्यालय, भोर यांच्याशी निगडित असल्याचे नमूद करून उप विभागीय अधिकाऱ्यांनी हा अर्ज तहसीलदार, भोर यांच्याकडे पाठविला. श्री. कोंढाळकर यांनी दि. ९ मार्च २००७ रोजी तहसीलदार, भोर यांच्याकडे अर्ज केला. तहसीलदार कार्यालयाने कळविलेले शुल्क भरल्यानंतर माहिती अपुरी असल्याच्या कारणावरून श्री. कोंढाळकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, भोर यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांचा निर्णय मान्य नसल्यामुळे श्री. कोंढाळकर यांनी उप विभागीय अधिकारी, भोर यांच्याकडे अपील केले. त्यांनी अपिलाची दखल न घेतल्यामुळे श्री. कोंढाळकर यांनी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे अपील केले. जिल्हाधिकाऱ्यांनी दि. ७.४.२००७ रोजी अपील निकाली काढले. त्यानंतर श्री. कोंढाळकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि.२४.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. 'संबंधित अधिकाऱ्यांना समक्ष बोलावून निर्णय घेणे आवश्यक असताना १५ दिवसांची तारीख मिळावी', अशी विनंती जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात केली. उभय बाजूंचे एकमत न झाल्याने अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

मौजे कुरंगवाडी या गावची जमीन एकत्रीकरण योजना दि.२३.५.१९७८ रोजी मंजूर झाली. तेव्हांपासून सन २००७ पर्यंतची सौ.शिळीमकर यांच्या जमिनीच्या संदर्भातील माहिती आपण मागितली होती. सौ. शिळीमकर हयात असताना सन १९८१ पासून त्यांना मयत दाखवून त्यांच्या जमिनीवर अन्य व्यक्तींची नोंद केली गेली. दि. १३.२.२००६ रोजी ते फेरफार रद्द करून सौ. शिळीमकर यांचे नावे क्षेत्र नोंदविण्यात आले. जिल्हाधिकारी किंवा विभागीय आयुक्त यांच्या परवानगीशिवाय हस्तांतरण किंवा पोटविभाग करता येणार नाही, अशी तरतूद जमीन एकत्रीकरण योजनेविषयीच्या कायद्यातील कलम ३१ अन्वये असताना कोणत्या कागदपत्रांद्वारे ही नोंद करण्यात आली ती माहिती, संबंधित क्षेत्राचा ताबा पावती यांची मागणी आपण केली होती. परंतु सौ. शिळीमकर यांना मयत दाखविण्याबाबतची कागदपत्रे व ताबा पावती आपल्याला अद्याप मिळाली नाही, असे श्री. कोंढाळकर यांनी नमूद केले.

स्थानिक चौकशीनुसार सौ.शिळीमकर या मयत असल्याची तलाठ्याकडील नोंद तत्कालीन मंडल अधिकाऱ्यांनी दि. २७.६.१९८१ रोजी प्रमाणित केली. त्यानंतर जवळ जवळ १५ वर्षांनी दि. १२.१.२००६ रोजी सौ. शिळीमकर यांनी उपआयुक्त (महसूल), पुणे विभाग, पुणे यांच्याकडे समक्ष भेटून व अर्ज करून याविरूध्द दाद मागितली. सौ. शिळीमकर हयात असल्याने तत्कालीन तहसीलदारांनी दि. २०.२.२००६ रोजी ही वारस नोंद रद्द केली व सौ.शिळीमकर यांचे नाव संबंधित क्षेत्राला नोंदविण्यात आले, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, भोर श्री. रामलिंग चव्हाण यांनी सांगितले. तत्कालीन तहसीलदारांनी जाब जबाब घेऊन खरेदीखताप्रमाणे चूक दुरूस्त केली आहे. ताबा पावती व तत्संबंधी कागदपत्रे एकत्रीकरण खात्याकडून घ्यावी लागतील, असे निवेदन त्यांनी केले.

ताबा पावती व मयत नोंदीबाबतची कागदपत्रे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. रामलिंग चव्हाण यांनी दिली नाही व नंतरची माहितीही मुदतीत दिली नाही, असे प्रतिपादन श्री. कोंढाळकर यांनी केले. या संदर्भात श्री. चव्हाण (तहसील कार्यालय, संजय गांधी योजना,

वाई ) यांचा खुलासा दहा दिवसात सादर करण्याचा मौखिक आदेश सुनावणीच्या वेळीच आयोगाने दिला.

आयोगाने आदेश देऊनही आपल्याला माहिती (कागदपत्रांच्या नकला) मिळत नसल्याची श्री. कोंढाळकर यांची तक्रार आयोगाला दि. १०.७.२००८ रोजी प्राप्त झाली. आयोगाने याबाबत संबंधितांकडे विचारणा केली. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. रामलिंग चव्हाण यांनी याआधी आयोगाला सादर केलेल्या अहवालाच्या स्वरूपाचाच लेखी खुलासा सादर केला.

श्री. कोंढाळकर यांचा अर्ज दि. १४.३.२००७ रोजी तहसीलदार कार्यालयाला प्राप्त झाल्यानंतर त्याच दिवशी माहिती उपलब्ध करून देण्याबाबत गाव कामगार तलाठी, कुरंगवाडी यांना आपण पत्र दिले. त्यांनी संबंधित फेरफाराचा उतारा दि. २०.३.२००७ रोजी तहसील कार्यालयाला सादर केला. दि. २८.३.२००७ रोजी आपण श्री. कोंढाळकर यांना शुल्क भरण्याबाबत कळविले. त्यांनी ते भरल्यानंतर उपलब्ध माहिती देण्यात आली. सौ. शिळीमकर या मयत असल्याची नोंद तत्कालीन गाव कामगार तलाठी यांनी दि. १९.१.१९८१ रोजी स्थानिक तपासानुसार मयत असल्याचे निष्पन्न झाल्याने केलेली आहे. तत्कालीन मंडल अधिकारी यांनी दि. २७.६.१९८१ रोजी ही नोंद प्रमाणित केली आहे. कोणत्याही अर्जावरून किंवा पुराव्याच्या माहितीवरून ती नोंद झालेली नसल्यामुळे त्याबाबतच्या कागदपत्रांच्या नकला पाठविता येणे शक्य नव्हते. तसेच जमीन एकत्रीकरण योजनेमध्ये दत्तात्रय भिकू व शकुंतला शिळीमकर यांचे नावे गट नंबर ४०१ पाडण्यात आलेले आहे. जमीन एकत्रीकरण योजनेनुसारच त्यांचे नाव दाखल केले असल्याने या कामी जिल्हाधिकाऱ्यांची पूर्व परवानगीची आवश्यकता नाही. या विषयीच्या कागदपत्रांच्या नकला श्री. कोंढाळकर यांनी भूमि अभिलेख खात्यांकडून उपलब्ध करून घेणे आवश्यक होते. आपण तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, भोर, उप संचालक, भूमि अभिलेख, पुणे आदींशी पत्रव्यवहार करून ताबा पावती व अन्य कागदपत्रे मिळवून देण्याचा प्रयत्न केला. परंतु अशी ताबा पावती आढळून येत नसल्याचे भूमि अभिलेख खात्याने कळविले आहे. हे काम महसूल खात्याच्या अखत्यारीत येत नाही, त्यामुळे महसूल खाते याबाबत कारवाई करू शकत नाही, असे श्री. कोढाळकर यांना वेळोवेळी स्पष्ट केलेले आहे, असे श्री. चव्हाण यांनी लेखी खुलाशात विस्ताराने नमूद केले आहे.

श्री. कोंढाळकर यांच्या तक्रारींनुसार वेळोवेळी संबंधितांचा खुलासा मागविण्यात आला. संबंधित ताबा पावतीचा आढळ होत नसल्याचे तालुका निरीक्षक, भोर यांनी दि. ९.९.२००८ रोजी कळविल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, भोर डॉ. रेखा सोळंके यांनी दि. १०.९.२००८ रोजी आयोगाला त्यांच्या पत्राच्या प्रतींसह अवगत केले. महसूल खात्याच्या अधिकार कक्षेतील माहिती देण्यासह सर्व कार्यवाही आपण पूर्ण केली असल्याचे श्री. रामलिंग चव्हाण यांनी लेखी निवेदनाद्वारे दि. २२.१०.२००८ रोजी आयोगाला, तर दि. २४.१०.२००८ या पत्रान्वये श्री. कोंढाळकर यांना कळविले.

'अर्जदार यांनी मागणी केलेली महसूल खात्याशी इतर सर्व संबंधित माहिती त्यांना यापूर्वीच देण्यात आलेली आहे. याबाबत कोणत्याही प्रकारची कसूर झालेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये उपलब्ध असलेली माहिती देण्याची तरतूद आहे. तरीही अर्जदार यांचे सोईच्या दृष्टीने मागणी केलेल्या माहितीचे संबंधित ३-४ वेळखाऊ प्रलंबित कामे करून दिलेली आहेत. अर्जदार यांना माहिती देणे विषयी अत्यंत प्रामाणिकपणे पाठपुरावा करणेत आलेला आहे. त्यामध्ये हेतु पुरस्सर कोणत्याही प्रकारचा विलंब झालेला नाही,' असे श्री. चव्हाण यांनी या निवेदनात नमूद केले आहे. 'माहिती देण्याबाबत एवढे प्रयत्न करूनही संबंधितांकडून काहीही प्रतिसाद न मिळाल्यामुळे शासकीय अधिकारी म्हणून मी हतबल झालो आहे', असेही श्री. चव्हाण यांनी आयोगाला सादर केलेल्या दि.१९.१.२००९ च्या निवेदनात म्हटले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व वरील तपशील पाहता श्री. कोंढाळकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार पध्दती अनुसरण्या ऐवजी प्रशासकीय पातळीवरील वरिष्ठांकडे अपील केल्याचे व अंतिमतः आयोगाकडे अपील केल्याचे दिसते. सौ. शिळीमकर यांची मयत म्हणून नोंद करण्यासंदर्भातील कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे व २५ वर्षांपूर्वीची ही नोंद असल्यामुळे ती देता आलेली नाहीत. असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. रामलिंग चव्हाण यांच्या सविस्तर निवेदनावरून दिसून येते. एखादी व्यक्ती हयात असताना ती मयत दाखविण्याचा प्रकार होतो, अधिकारी ती नोंद प्रमाणित करतात, संबंधित व्यक्तीच्या लक्षात २० वर्षांनी ही नोंद येते व त्यानंतर दाद मागितल्यावर नोंद दुरूस्त केली जाते, हा सर्वच प्रकार गंभीर आहे. श्री. कोंढाळकर यांनी त्याद्वारे शासकीय कारभारातील गैरप्रकारावर

प्रकाश टाकला आहे. मात्र श्री. कोंढाळकर यांची मूळ विषयाबाबतची तक्रार गंभीर असली तरी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत तिचा विचार करता येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २४.७.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.लक्ष्मण हरीभाऊ जोरी
६८२-बी, बिबवेवाडी, ओटा नं.६, पुणे ३७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ क्र.२, पुणे शहर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
स्वारगेट विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८९०+८२२ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.६.२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.लक्ष्मण हरीभाऊ जोरी
६८२-बी, बिबवेवाडी, ओटा नं.६, पुणे ३७

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
स्वारगेट विभाग, पुणे श्री.एन.आर.डांगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१४.६.२००६ , ३१.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.७.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.२.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>डॉ.शुभदा जठार, सुनिता जोरी, लक्ष्मण हरिभाऊ जोरी व उर्मिला जोरी यांचे जबाब व त्यावरील कारवाई, डॉ.जठार यांनी ऑपरेशन पूर्वी केलेली तपासणी रिपोर्ट व उर्मिला जोरी ह्यांचे उपचार घेतल्यापासून ऑपरेशन झाल्यापर्यंतचे पेशंट बु व ऑपरेशनवेळी वापरलेल्या औषधांचा तपशील, ऑपरेशन संमतीपत्र, संबंधितांवर कारवाई झाल्याचा रिपोर्ट व त्या संदर्भातील पोलिसांनी जमा केलेले पुरावे, लक्ष्मण हरिभाऊ जोरी यांचा लिहिलेला जबाब, त्यावरील कारवाई, रिपोर्ट, संबंधित पुरावे व श्री.सपकाळांनी वरिष्ठांना पाठविलेल्या अहवालाची प्रत. श्री.लक्ष्मण जोरी व राहीबाई फरार असल्याचे एन.सी. व लक्ष्मण जोरी व उर्मिला यांच्याविरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल त्याची प्रत. भारतीय नागरिकत्त्वाच्या दिलेल्या अर्जावरील कार्यवाही. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.लक्ष्मण हरिभाऊ जोरी यांनी पोलिसांकडे आपल्या पत्नीच्या संदर्भात केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने 'भारतीय नागरिकत्वाचा राजीनामा' देण्याच्या अर्जाबाबतच्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत माहिती मागितली होती. बिबवेवाडी पोलीस चौकी, पुणे, सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे पोलीस आयुक्त कार्यालय; पुणे शहर, अतिरिक्त महासंचालक; सीआयडी; पुणे, गृह खाते, उपमुख्यमंत्री कार्यालय, महाराष्ट्र शासन अशा विविध ठिकाणी त्यांनी अर्ज केले होते. हे अर्ज त्या त्या कार्यालयांनी संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांकडे वर्ग केले. त्यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने श्री.जोरी यांनी केलेल्या अपिलांवर अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र.२, पुणे शहर यांनी दिलेल्या निर्णयाने समाधान न झाल्याने श्री.जोरी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

श्री.जोरी यांनी आपल्या घटस्फोटाच्या अनुषंगाने मा.राष्ट्रपतींपासून सहाय्यक पोलीस आयुक्तांपर्यंत विविध पातळ्यांवर अर्ज केले असून वेळोवेळी संबंधितांनी त्यांना उत्तरे दिली आहेत. परंतु आपल्याला दिशाभूल करणारी, अपुरी व खोटी माहिती दिली जात असल्याचा आक्षेप श्री.जोरी यांनी विविध अर्जांमध्ये व निवेदनांमध्ये नोंदविला आहे. आयोगाकडे त्यांनी केलेल्या अपिलांचा समावेश आयोगाच्या दि.२४.६.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सदर अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

आपल्या पत्नीने घटस्फोटासाठी दावा केला व आपल्याऐवजी अन्य व्यक्ती उभी करुन घटस्फोट मान्य करुन घेतला. त्याबाबत पत्नी, चुलता, डॉक्टर यांच्याविरुध्द आपण दिलेल्या फिर्यादीचे पुढे काय झाले व कोणती कारवाई केली, याची विचारणा आपा सातत्याने करीत आहेत. पोलीस उपनिरीक्षक अश्विनीकुमार पर्वती सपकाळ यांनी या प्रकरणात तपासात पक्षपातीपणा केला असून अनेक मुद्दयांबाबत  दिशाभूल करणारा अहवाल दिला आहे, असे प्रतिपादन श्री.जोरी यांनी केले.

सन २००६ पासून हे प्रकरण चालू असून पोलीस उपनिरीक्षक श्री.सपकाळ यांनी चौकशी केली आहे. वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे, परंतु त्यांचे समाधान होत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, स्वारगेट, पुणे श्री.एन.आर.डांगे यांनी केले. 'काही माहिती हेतुपुरस्सर दिली गेली नाही व मला जी काही माहिती दिली गेली ती दिशाभूल करणारी व मी केलेल्या अर्जाशी विसंगत व सदर अर्जाचा तपास करणारे पोलीस उपनिरीक्षक श्री.सपकाळ यांनी वरिष्ठाचा आदेश न मानणारी होती व माहितीच्या कायद्याचे पालन न करणारी होती. विशेष म्हणजे मी व माझ्या आईने आत्महत्या केल्यानंतर आम्ही जिवंत आहे याची खात्री केल्यानंतर दि.१८.४.२००६ रोजी तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक श्री.सपकाळ व दि.१७.४.२००६ रोजी तत्कालीन वरिष्ठ पोलीस उपनिरीक्षक श्री.पाटील, सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे यांनी माझ्या अर्जाच्या तपास अहवालावर सह्या केलेल्या आहेत. विशेष म्हणजे सदर

अहवाल अतिशय संशयास्पद व १००टक्के बनावट आहे, की सदर तपास अहवाल तयार केला दि.१८.४.२००६ रोजी व अहवाल तयार होण्यापूर्वीच दि.१७.४.२००६ रोजी तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सर्जेराव पाटील, सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे यांनी सदर अहवालावर सही केली. सर्वसाधारणपणे आगाऊ सही वरिष्ठ पोलीस अधिकारी करत नाही. संपूर्ण तपासात गुन्हे घडलेले असताना गुन्हे घडले नाही असे सदर दिलेल्या माहितीवरुन निदर्शनास येत आहे,' असे श्री.जोरी यांनी अपील अर्जात व वेळोवेळी सादर केलेल्या निवेदनांमध्ये म्हटले आहे. गुन्ह्याचा तपास योग्य रीतीने झाला नाही, तो व्हावा व आपल्या अपेक्षेनुसार संबंधितांवर कार्यवाही व्हावी, अशी श्री.जोरी यांची लेखी व तोंडी निवेदनामधील मुख्य मागणी आहे. अशा प्रकारच्या कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. तपासाबाबत काही तक्रार असल्यास श्री.जोरी यांनी प्रशासकीय मार्गाने संबंधित नियमावलीनुसार दाद मागणे हा स्वतंत्र भाग आहे. मात्र केलेली कार्यवाही व दिलेली माहिती यात विसंगती असल्यास दिलेली माहिती चुकीची ठरेल. माहिती चुकीची असल्याचे श्री.जोरी यांच्या लेखी व तोंडी निवेदनातून स्पष्ट होत नाही. पोलिसांकडून विशिष्ट कार्यवाही अपेक्षित होती पण वेगळ्या प्रकारची कार्यवाही केली गेली, असे त्यांचे प्रतिपादन आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अशा तक्रारीची दखल घेता येणार नाही. आपण केलेल्या सर्व अपिलांच्या प्रती व माहितीतील चुका / विसंगती याबाबत स्पष्टीकरण करणारे लेखी निवेदन श्री.जोरी यांनी जन माहिती अधिकारी तथा पोलीस **उपायुक्त,स्वारगेट, पुणे यांना द्यावे व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.** पोलिसांनी केलेल्या कारवाईच्या अनुषंगाने वस्तुस्थितीची निःसंदिग्ध माहिती त्यांना मिळाली पाहिजे, म्हणून परिमंडळ क्र.२ मधील श्री.जोरी यांच्या सर्व अपिलांचा एकत्रित विचार करुन पोलीस उपनिरीक्षक श्री.सपकाळ यांचे माहितीबाबतचे लेखी म्हणणे घेऊन या संदर्भातील संपूर्ण माहिती दि.२५.७.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावी व त्याची प्रत श्री.जोरी यांना द्यावी असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला.

तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र.२, पुणे शहर श्री.सतीश खंदारे हे सुनावणीला हजर नव्हते, तसेच त्यांनी गैरहजेरीबाबत व अपिलांबाबत कोणत्याही स्वरुपाचे निवेदन सादर केले नव्हते. ही बाब आक्षेपार्ह आहे. दि.२५.७.२००८ पर्यंत अहवाल सादर करण्याच्या आयोगाच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, स्वारगेट, पुणे व पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र.२, पुणे शहर यांनी अहवालही सादर केला नाही. आयोगाने विचारणा केल्यानंतर हा अहवाल सादर करण्यात आला. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एन.आर.डांगे यांनी विहित मुदतीत कार्यवाही करुन पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र.२, पुणे शहर यांना दि.२९.१०.२००८ रोजी अहवाल सादर केला होता व दि.१९.१२.२००८ रोजी श्री.जोरी यांना त्याची प्रत सादर केली होती. आयोगाने विचारणा केल्यानंतर दि.१.७.२००९ रोजी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे श्री.अभय येवले यांनी आयोगाला ही प्रत सादर केली. आयोगाच्या आदेशानुसार कार्यवाहीचा अहवाल विहित मुदतीत सादर न केल्याबद्दल तत्कालीन पोलीस उपायुक्त, परिमंडळ-२, पुणे शहर श्री.अनंत शिंदे व विद्यमान पोलीस उपायुक्त, परिमंडळ-२, पुणे शहर श्री.सतीश खंदारे यांना समज देण्यात येत आहे.

श्री.जोरी यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे याबाबत आपण त्यांच्याशी वारंवार संपर्क साधल्याचे व दि.१.१०.२००८ रोजी अपिलाची छायांकित प्रत त्यांनी सादर केल्याचे श्री.डांगे यांनी अहवालात नमूद केले आहे. या प्रतीवरुन श्री.जोरी यांना अपेक्षित असलेल्या माहितीची कल्पना येत नसल्यामुळे आपण त्यांच्याकडून मुद्देनिहाय तपशील त्यांच्या जबाबाद्वारे समजून घेतला व त्यानंतर; श्री.सपकाळ यांची ठाणे येथे बदली झाली असल्यामुळे त्यांना बिनतारी संदेश पाठविला. दि.२७.१.२००९ रोजी समक्ष उपस्थित राहून श्री.सपकाळ यांनी मुद्देनिहाय तपशील स्पष्ट केला, असे नमूद करुन श्री.डांगे यांनी श्री.सपकाळ यांचे मुद्देनिहाय निवेदन अहवालात सादर केले आहे. श्री.डांगे यांनी आयोगाच्या आदेशाच्या कार्यवाहीबाबत घेतलेले परिश्रम उल्लेखनीय आहेत.

श्री.जोरी यांना सर्व माहिती पुरविण्यात आली आहे. त्यांची घटस्फोटित पत्नी श्रीमती उर्मिला हिच्या विरुध्द दाखल न होणारा गुन्हा दाखल करुन त्याबाबतची माहिती देण्याबाबत ते आग्रही आहेत, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे श्री.अभय येवले यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व तोंडी निवेदने यांचा विचार करता श्री.जोरी यांची मुख्य तक्रार पोलिसांच्या कारवाईविषयीची आहे. हा प्रथम कार्यवाहीचा भाग असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्याची दखल घेता येणार नाही. मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
पुणे खंडपीठ

**पुणे**
दि.४.७.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहेत :-

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८९५/ पुणे | श्री. शंकर भगवान काळे मु.पो.पळसदेव, ता.इंदापूर, जि.पुणे | मुख्यलिपिक, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, इंदापूर यांचे कार्यालय, इंदापूर, जि. पुणे | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, इंदापूर, जि. पुणे | विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित पळसदेव नं.२ या संस्थेच्या संदर्भातील एकूण ७ मुद्दयांची माहिती | दि. २४.६.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये चर्चेनंतर अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे मध्ये अपील निकाली काढण्या-बाबत एकमत झाल्याचे संयुक्तपणे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ९१५ / पुणे | श्री. लक्ष्मण गणपत गुणवरे मु.पो.अगोती नं.१, ता.इंदापूर, जि. पुणे | प्रभारी कार्यकारी संचालक, इंदापूर सहकारी साखर कारखाना मर्या., महात्मा फुले नगर (बिजवडी), ता.इंदापूर, जि.पुणे | प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ | इंदापूर सहकारी साखर कारखान्याचा ऊस गाळपासंबंधी आकडेवारी, त्यामधील तफावत, वजनाची पध्दत, कारखान्याचे अहवाल इ. संदर्भात व चुकीच्या कार्य पध्दतीसंबंधी माहिती व | दि. २४.६.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास कारखान्याच्या अभिलेखानुसार माहिती दिल्याचे नमूद केले. तथापी अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केल्यानुसार त्यांची मूळ मागणी ही भ्रष्टाचारासंबंधी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | भ्रष्टाचारासंबंधी योग्य ती कारवाई होण्याची मागणी | कारवाई करण्याची आहे. अशा प्रकारे कारवाईची मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ३ | ९४० / पुणे | श्री. दत्तात्रय अनंत मुळे फ्लॅटनं.३०१, एन्क्लेव्ह अपार्टमेंट, गंगाधाम, फेज-१ लेन, बिबवेवाडी-कोंढवा रोड, मार्केट यार्ड, पुणे-३७ | विशेष लेखा परीक्षक वर्ग-१ अधिन विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखा परीक्षण), पुणे विभाग, २२, डॉ. आंबेडकर मार्ग, मझदा बिल्डिंग, पुणे-१ | विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, (लेखा परीक्षण), पुणे विभाग, २२, डॉ. आंबेडकर मार्ग, मझदा बिल्डिंग, पुणे-१ | विशेष लेखा परीक्षक वर्ग-१, अधिन विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखा परीक्षण), या कार्यालयातील श्री. व्ही.एम.मेहर, उप लेखापरीक्षक हे रजेवर असताना त्यांना अदा करण्यात आलेल्या ड्यूटीचे बाबत दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करून माहिती देण्या-बाबत, तसेच सदर कार्यालयातील सौ.डी.व्ही.पारथी, विशषे लेखा-परीक्षक वर्ग-२ सहकारी संस्था, यांना दिलेल्या पदभारा संदर्भात कायदेशीर अधिकारासंबंधी विचारणा | अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती विहित मुदतीत देण्यात आलेली आहे. ऊर्वरित कर्मचाऱ्यांवर केलेल्या कारवाईबाबतची माहिती उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने अपील निकाली काढावे, असे दि.२४.६.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले होते. त्यानुसार दि.२३.७.२००८ च्या पत्रान्वये संबंधित जबाबदार कर्मचाऱ्यांवर केलेल्या कारवाई संबंधीच्या ज्ञापनाच्या प्रती अपीलकर्त्यास उपलब्ध करून दिल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १००९/ पुणे | श्री. निसार जब्बार शेख रा.नेहरू चौक, डॉ.गोडबोले शेजारी, दौंड, जि. पुणे | मुख्याधिकारी, दौंड, नगरपरिषद, जि. पुणे | उप आयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे-१ | दौंड नगर-परिषदेच्या व्यापार संकुलाच्या शॉपिंग सेंटर बांधकामाचा मिळालेला निधी व त्याचा विनियोग इ. च्या अनुषंगाने एकूण ९ मुद्दयां-बाबतची माहिती | अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती दि. २८.९. २००६ रोजी दिलेली आहे. तसेच त्यांना आवश्यक त्या माहितीचे अवलोकन करण्यास उपलब्ध करून देण्याबाबत देखील जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, दौंड नगर परिषद यांनी अपीलकर्त्यास कळविले आहे.<br>अपीलकर्ता यांनी नगर परिषदेच्या पाण्याच्या टाकी बांधण्याच्या जागेत अतिक्रमण करून बेकायदेशीरपणे टाकलेली टपरी नगर परिषदेने हटविल्यामुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये नगर परिषदे कडे वारंवार अर्ज करीत असतात, असे दि. २४.६. २००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रासोबत दिलेल्या निवेदनामध्ये मुख्याधिकारी, दौंड नगर परिषद यांनी नमूद केले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अशा प्रकारच्या दुरूपयोगाबाबत अपीलकर्ते श्री. शेख यांना समज देण्यात येत आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनुक्रमांक १ ते ४ (क्र. ८९५/पुणे, ९१५/पुणे, ९४०/पुणे व १००९/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि.०६.७.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ